## प्रकरण 7 वे

## स. का. पाटील महानगरपालिका मालाड (पूर्व) येथील स्थापन केलेल्या समित्या

(अ) गा-हाणे समिती

या मध्ये रूग्णालयाचे कर्मचारी वर्ग आणि म्युनिसिपल संघटना यातील सदस्य असतात ही समिती 1995 मध्ये स्थापिली गेली कामगाराचे गा-हाणे मांडणे हे याचे मुख्य उद्दिष्ट आहे. ही समिती महिन्यातून एकदा एकत्रा येवून वरिष्ठ व कामगार या मधील समस्या सोडविते. या सभेत चर्चिला जाणा-या अनुक्रमणिका सहयानिशी तयार करून सर्वाना वाटली जाते जनतेला या मध्ये सहभाग घेता येत नाही.

(ब) दक्षता समिती

या समितीमध्ये रूग्णालयाचे प्रशासक, सामाजिक कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधीचा सहभाग असतो याचा मुख्य उद्देश रूग्णालयात येणा-या रूग्णांच्या व त्यांच्या नातेवाइकांच्या समस्या समझून घेवून त्याचे निवारण करण्यासाठी उपाय योजना करून त्यांची समस्या हलकी होईल हे पहाणे. त्यांची कामे म्हणजे, मूळ समस्या काय आहेत हे पाहून रूग्णालयाच्या प्रशासकाकडे नोंदवणे आणि त्यावर योग्य ते उपाय योजना करणे असे आहे. जेणेकरून सर्व जनतेचे व रूग्णालयाचे सबंध सुधारतील. या समिती मध्ये प्रमुख वैद्यकिय अधिकारी, मुख्य लिपीक, सामाजिक कार्यकर्ते व दोन नगरसेवक असतात ही समिती महिन्यातून एकदा भेटते. बैठकीची अनुक्रमणिका तयार करून ती वितरीत केली जाते. सर्वसाधारण जनता हया समिती मध्ये प्रत्यक्षरित्या भाग न घेता नगरसेवका मार्फत घेतात.